**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १** **<u>सं.फौ.ख.क्र. ३७४/२०२२</u>**

महाराष्ट्र शासन वि. दिलीप जयस्वाल

**नि.क्र. १० खाली**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | केशवराव लहानुजी सातपुते, |
| वय | – | अंदाजे ७७ वर्षे, |
| व्यवसाय | – | काही नाही, |
| राहणार | – | मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर |

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

दि. २८/०५/२०२२ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतेही कार्यवाही केली नाही आणि घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केले नाही. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कोणतेही सुचनापत्र दिलेले नव्हते. आता मला दि. २८/०५/२०२२ चे सुचनापत्र दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही नाही. त्यावर कोणाची सही आहे हे मी ओळखु शकत नाही. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही नाही. त्यातील मजकूरा बाबत मला काहीही माहिती नाही. पोलीसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नव्हती व माझे बयान नोंदविले नव्हते.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास उलटतपासणीमध्ये विचारल्या जाणारी प्रश्न विचारण्याची परवानगी भारतीय साक्ष अधिनियम चे २०२३ चे कलम १५७ प्रमाणे देण्यात येत).**

**२.** मी आरोपी दिलीप जयस्वाल ला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०५/२०२२ रोजी पोलीस माझ्याकडे आले होते आणि मला पंचनाम्यासाठी समजपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या घरातुन देशी दारुच्या ०५ निपा जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, समजपत्र व

घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर माझी सही आहे. मी दुसरा पंच निखील खंडार यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी न्यायालयात उपस्थित राहुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री एम. पी. तिवारी यांच्यामार्फत उलटपासः–</u>**

**<u>उलटतपास नाकारले.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

माझे समक्ष,

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.11 01:13:00 -0500

**(रोहन विजयकुमार थाईल)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः ११/१२/२०२५**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.11 01:13:05 -0500

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

**दिनांकः ११/१२/२०२५.**

**माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 02 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे. व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

| | |
|---|---|
| **साक्षीदाराची सही** | **विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता** |
| **(केशवराव लहानुजी सातपुते)** | **(व्ही. यु. मिरचे)** |